**नियमित दिवाणी दावा क्र.७४/२०१८**
**वैजनाथ वि. चंदर व ईतर**

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

वादी, प्रतिवादी आणि त्यांचे अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर आहेत. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. नोंदणीकृत डाकेने पाठविलेल्या समन्ससह लिफाफा निशाणी ७९ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक १० ललिताबाई यांनी समन्स घेण्यास नकार दिलेला आहे. त्याप्रमाणे सदर समन्स बजावल्याचे समजता येईल. यथास्थितीत प्रतिवादी क्र. १० हया दावा समन्स बजावून सुद्धा हजर झालेल्या नाहीत. सबब त्यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्रमांक २ आणि ३ करीता अधिवक्ता श्री. भोसले यांनी पुरसीस निशाणी ८२ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक ७ चा दिनांक ९/८/२०२५ रोजी मृत्यू झाल्याचे कळविले. परंतू वादीने प्रतिवादी क्रमांक ७ च्या वारसांना दाव्यामध्ये सामील केलेले नाही. सबब वादीने त्याची नोंद घ्यावी व पुर्तता करावी अन्यथा पुढील आदेश पारीत केला जाईल्.

०३. बेलीफ अहवाल निशाणी ८१ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक ८ यांना दावा समन्सची बजावणी झालेली नाही. वादीने त्यांच्याविरुद्ध उचित कार्यवाही केलेली नाही. सबब अंतिम संधी म्हणून वादीने उचित कार्यवाही करावी, अन्यथा

त्यांच्याविरुध्द दावा खारीज करण्यात येईल.

०४. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.02.17 17:57:23 +0530

**ठिकाण — देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – १७–०२–२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**